महाराष्ट्र शासन
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छ.संभाजीनगर - ४३१ ००१**
*Govt. Medical College & Hospital, Chh.Sambhajinagar – 431 001*
**अधिष्ठाता कार्यालय**
ई मेल : deangmca@gmail.com
कार्यालय : 0240-2402028

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.शावैमछस/लले/ 180 /२०२४,

दिनांक :- 28/03/24

(( **महत्त्वाचे** ))

**प्रति,**
अॅड. प्रिती डिग्गीकर,
सरकारी वकील,
उच्च न्यायालय खंडपीठ,
*छत्रपती संभाजीनगर*

*विषय* :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेच्या **"अंतर्गत समिती"** मध्ये समावेश करणेबाबत..

महोदया,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण, प्रतिबंध मनाई व निवारण करुन त्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेमध्ये **"अंतर्गत समिती"** ची स्थापना करण्यात आली आहे.

उपरोक्त समितीला कायदेशिर सल्ला देण्यासाठी आणि तक्रारदार महिलांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्यासाठी "अंतर्गत समिती" मध्ये कायदेशिर सल्लागार म्हणून आपली नियुक्ती करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. सोबत समिती स्थापनेची प्रत आपणास माहितीस्तव जोडण्यात येत आहे. आपल्या कायदेविषयक ज्ञानाचा या संस्थेला फायदा होणार आहे. या समितीतील सदस्यांना महिलांच्या संरक्षणविषयक बाबींची सखोल माहिती होईल.

आपण आमच्या विनंतीला मान देऊन "अंतर्गत समिती" च्या कायदेशिर सल्लागार म्हणून जबाबदारी स्वीकारली, त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. आपल्या कायदेविषयक ज्ञानाचा या संस्थेला फायदा होईल, याबद्दल आम्ही नि:शंक आहोत.

धन्यवाद.

आपला,

**(डॉ.शिवाजी सुक्रे)**
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र शासन
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छ.संभाजीनगर - ४३१ ००१**
*Govt. Medical College & Hospital, Chh.Sambhajinagar – 431 001*
**अधिष्ठाता कार्यालय**
ई मेल : deangmca@gmail.com
कार्यालय : 0240-2402028

जा.क्र.शावैमछस/लले/ 2287 /२०२४, दिनांक :- 28 MAR 2024

## (( कार्यालयीन आदेश ))

*विषय* :- "अंतर्गत समिती" (महिला तक्रार निवारण) स्थापन करणेबाबत

वरील विषयी कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण प्रतिबंध मनाई व निवारण अधिनियम - २०१३ अन्वये आणि शासन निर्णय क्र. मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक, दिनांक १९/६/२०१४ मधील निर्देशानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेमध्ये महिलांचे कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून संरक्षण, प्रतिबंध, मनाई व निवारण करण्यासाठी "अंतर्गत समिती" ची स्थापना करण्यात येत आहे.

१) *डॉ.अर्चना वरे, प्राध्यापक (नेत्रशल्यचिकित्साशास्त्र) .. अध्यक्ष*
*मो. ९४२३१४८५८३*
२) ॲड.प्रिती डिग्गीकर, शासकीय अभियोक्ता .. सदस्य
(उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद) मो. ९८२३१८९३७८
३) डॉ.शिल्पा आसेगांवकर, प्राध्यापक (जीवरसायनशास्त्र) .. सदस्य
मो. ९४२०७६३४३०
४) डॉ.काशिनाथ गर्कल, उप अधिष्ठाता (प्रशा) तथा .. सदस्य
सहयोगी प्राध्यापक (शरीरक्रियाशास्त्र) मो. ९८२२२४०२२७
५) डॉ.स्वप्ना अंबेकर, सहयोगी प्राध्यापक (शरीररचनाशास्त्र) .. सदस्य सचिव
मो. ९८२२६४६४२४
६) डॉ.जयश्री भाकरे, सहयोगी प्राध्यापक (सुक्ष्मजीवशास्त्र) .. सदस्य
मो. ९१५८८१८८४४
७) डॉ.स्वाती बडगीरे, सहाय्यक प्राध्यापक (स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र) .. सदस्य
मो. ७४४८२२०९८८
८) डॉ.संजीवनी गायकवाड, अधिसेविका (रुग्णालय) .. सदस्य
मो. ९४०३५३९००८
९) श्रीमती स्वाती वराडे, निम्नश्रेणी लघुलेखक, शा.वै.म.छ.संभाजीनगर. सदस्य
मो. ७९७२६६०५७४

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळवादास प्रतिबंध करण्यासाठी शासनाने अंतर्गत तक्रार समिती स्थापन करण्याचे निर्देश दिलेले आहेत. लैंगिक छळवादामध्ये अशोभनीय अशा हेतुपूर्वक लैंगिक वर्तनाचा, प्रत्यक्ष वा अन्यथा याचा समावेश होतो आणि त्याबाबतची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.

१. शारीरिक संपर्क कामोद्दिपक प्रणयचेष्टा.
२. लैंगिक सौख्याची मागणी अथवा विनंती.
३. लैंगिक वासना प्रेरित करणारे शेरे.
४. कोणत्याही स्वरुपाची संभोग वर्णन/संभोग दर्शन/अश्लील साहित्याचे प्रदर्शन.
५. कोणतेही अन्य अशोभनीय शारीरिक, तोंडी अथवा सांकेतिक आचरण.

उपरोक्त व्याख्येत नमूद केलेल्या घटनांसंदर्भात विभागातील तसेच कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांनी अंतर्गत महिला समितीकडे तक्रार दाखल केल्यास तातडीने त्याबाबत कार्यवाही करुन तसा निम्नस्वाक्षरीतांना लवकरात लवकर स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा.

(डॉ.शिवाजी बी.सुक्रे)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
छत्रपती संभाजीनगर

**प्रति,**

वरील संबंधितांस
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर.